**अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना परदेशातील शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती योजनेतील वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्यास मंजुरी देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक -आदिशी -१२०३/प्र.क्र.७६/का-१२**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ११ एप्रिल, २०१२.**

**वाचा :-** शासन निर्णय, क्रमांक आदिशी १२०३/प्र.क्र.७६/का१२, दि. ३१ मार्च, २००५.

**प्रस्तावना :** अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून विविध विषयांमध्ये परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या १० अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणाकरिता परदेशी शिष्यवृत्ती योजना दिनांक ३१ मार्च, २००५ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. २.५० लाख ठरविण्यात आली होती. सदर मर्यादा कमी असल्याने व या योजनेचा लक्षांक पूर्ण होण्याच्या दृष्टीने अपेक्षित असा प्रतिसाद न मिळाल्याने उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता परदेशातील शिक्षणासाठी दिनांक ३१ मार्च,२००५ च्या शासन निर्णयान्वये लागू असलेल्या शिष्यवृत्ती योजनेच्या नियमावलीतील मुद्दा क्र. ८ अन्वये विहित केलेली रु.२.५० लक्ष ही कमाल वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आता कमाल रु. ४.५० लक्ष (रूपये चार लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या रकमेपर्यंत वाढविण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.संदर्भाधीन शासन निर्णयातील उर्वरित सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

**०२.** हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७/व्यय-१४, दि ३१.१.२०१२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**०३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ***www.maharashtra.gov.in*** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक *२०१२०४११०७३२०१४१००१* असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( डॉ. रमेशचंद्र सागर )**
**प्रधान सचिव**

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मंत्री,आ.वि. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२

मा.राज्यमंत्री,आ.वि. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग)मंत्रालय मुंबई-३२
सचिव (सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य विभाग,) मंत्रालय मुंबई-३२
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, वैदयकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती.
विधानमंडळ ग्रंथालय.
वित्त विभाग (व्यय १४ /१७), मंत्रालय, मुंबई-३२.
सर्व कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
निवड नस्ती (कार्या.१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.